(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. XIII / Issue – III ISSN 2277-8063

# शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक, सामाजिक तत्वज्ञान

**डॉ.गवराम नाना पोटे** सहयोगी प्राध्यापक (मराठी विभागप्रमुख) काकासाहेब चव्हाण कॉलेज, तळमावले

ता.पाटण, जि.सातारा मो.नं.९८८१६२१८८४ E-Mail: gawarampote@gmail.com

---

**प्रास्ताविक:-** महाराष्ट्र ही महापुरुषांच्या रत्नांची खाण आहे. समाजजीवनाचा तोल जातो, नीती मूल्यांचा र्हास होतो, त्यावेळी मानवधर्म सांगण्यासाठी युगपुरुष जन्माला येतात.महान व्यक्तींची विचारसंपदा पिढ्यानपिढ्यांना प्रेरक ठरते.समाजसुधारणा, स्वातंत्र्यप्राप्तीआणि शिक्षणप्रसार या गत दोन शतकांच्या प्रेरणा दिसतात. २० वे शतकहेतत्वज्ञानाचसुवर्णयुगआहे.ज्ञानाचे पर्व आहे.महाराष्ट्राला शैक्षणिक चळवळीची मोठी परंपरा आहे. ज्ञान ही जीवनाची प्रचंड शक्ती आहे. ज्ञान हा सद्गुण आहे. ज्ञान ही जीवनाची गुरुकिल्ली आहे. शिक्षण हे सर्वांगीण सुधारणेचे प्रवेशद्वार आहे. ज्ञानाचा मार्ग सार्वजनिक उन्नतीकडे जातो.शिक्षणाने माणूस घडतो.पण महाराष्ट्रातील बहुसंख्य वर्ग या प्रवेशद्वारापासून वंचित होता.माणसामाणसाने समाज घडतो व समृद्ध समाजच बलशाली राष्ट्र निर्माण करतो.आज घडीला मानवी मूल्यांसाठी समर्पित भावनेने कार्य करणारी माणसे दुर्मिळ झाली आहेत.आपल्या देशात नेहमी त्यागी महापुरुष ज्ञानदानाचे कार्य करीत आले आहेत.

महाराष्ट्राला शैक्षणिक चळवळीची मोठी परंपरा आहे.महाराष्ट्रात शिक्षणाचा प्रचार आणि प्रसारासाठी अनेक समाजसुधारकांनी जिवाचे रान केले, प्रतिकूल परिस्थितीशी झगडत मोठेपण मिळविले.महात्मा जोतीराव फुले यांनी जातिभेद, अस्पृश्यता आणिस्त्रियांचे शोषण यांविरुद्ध बंड पुकारून शुद्रातिशुद्रांसाठी तसेच मुलींसाठी शिक्षणाची दारे खुली केली.म.फुले, सावित्रीबाई फुले, महर्षी कर्वे, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, राजर्षी शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे, पंजाबराव देशमुख, संत गाडगेबाबा, तुकडोजी महाराज आदींनी अस्पृश्य वर्गामध्ये सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या जागृती घडविण्याचे कार्य केले.

जोपर्यंत त्यागी जनांकडून ज्ञानदानाचे कार्य घडत होते तोपर्यंत देशाचे भविष्य उज्ज्वल होते.परंतु आज संपूर्ण विकासाचा पाया म्हणून ज्या शिक्षणक्षेत्राकडे पाहिले जाते त्याची स्थिती कमालीची क्षतिग्रस्त झाली आहे.आज भारतातील शिक्षणव्यवस्थेचा प्रवास उलट्या दिशेने सुरूआहे.संस्कारमूल्ये, मनावर नियंत्रणाऐवजी चंगळवाद अनुभवातून शिकण्याऐवजी माहितीचा साठा करणे आणि विश्व मानवतेऐवजी आत्मकेंद्रीतता दिसत आहे. सध्याच्या काळात प्रचंड उच्च शिक्षित मंडळी आत्मकेंद्रित व अंधश्रद्धाळु दिसतात तेव्हा भारतात साक्षरतेचा प्रसार झाला आहे, शिक्षणाचा नाही असेच म्हणावे लागेल.महाराष्ट्रासारख्या पुरोगामी आणि शैक्षणिक चळवळीची बीजे रोवणाऱ्या राज्यात शिक्षणाविषयीची अनास्था चिंताजनक आहे. दिवसेंदिवस शैक्षणिक गुणवत्ता ढासळत चालली आहे.सध्याच्या काळात पैसा हा घटक शिक्षणामध्ये महत्त्वाचा ठरत आहे. अभिजनांसाठी विशेष शिक्षण व सर्वसामान्यांसाठी दुय्यम शिक्षण हे शासनाचे सार्वजनिक धोरण आहे. जागतिकीकरणाच्या युगात दर्जेदार शिक्षणावर भर देणे आणि त्यातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणणे अतिशय महत्त्वाचे ठरणार आहे. या सर्व पार्श्वभूमीवर शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक, सामाजिक तत्वज्ञान समजून घेणे, कृतीत आणणे अगत्याचे आहे.

**संशोधन पद्धत:-** मराठी भाषेतील निवडक कलाकृती, विविध लेख, संदर्भ ग्रंथांचा अभ्यास करून मांडणी केली आहे. प्राथमिक व दुय्यम माहितीचे संकलन करून संशोधन विषयाची मांडणी केली आहे.

**शोधनिबंधाचा उद्देश:-**शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या शिक्षणविषयक विचारांचा,भूमिकांचा ऊहापोह करणे.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक,सामाजिक कार्यामुळे झालेल्या समाजबदलाचा मागोवा घेणे.

**ज्ञानतपस्वी शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे:-** बापूजींनी १९५४ मध्ये बीजारोपण केलेल्या श्री स्वामी विवेकानंद शिक्षण, संस्थेचा ज्ञानवृक्ष आता बहरला आहे. संस्थेच्या उभारणीपासून उत्कर्षापर्यंत अनेकांनी योगदान दिले आहे. या ज्ञानवृक्षाखाली अनेक पिढ्या घडल्या आणि आजही शिक्षणाची ज्ञानगंगा तळागाळातील कष्टकरी, गोरगरीब समाजातील मुलाबाळांपर्यंत पोहोचविण्याचे महान कार्य संस्था करीत आहे.सह्याद्रीच्या कडेकपारी, डोंगरदऱ्यात जेथे ज्ञानाची पहाट उगवली नाही तेथे आपण ज्ञानदीप लावू या.या उदात्त ध्येयाने शिक्षणाची मशाल हाती घेऊन ज्ञानाचा प्रकाश सर्वदूर पोहोचविण्यासाठी शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे महाराष्ट्राच्या कडेकपारी हिंडले.त्यातून गावा-खेड्यातील शुद्रातिशूद्र आणि महिलांपर्यंत शिक्षणाचा प्रसार झाला.बापूजींमुळे शतकानुशतके निरक्षर असणाऱ्या शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी, गरीब जनतेला अक्षरांची ओळख झाली आणि शिक्षणाच्या माध्यमातून प्रगतीच्या दिशेने वाटचाल करण्याची संधी मिळाली.जिथे सरकार पोचणार नाही तिथे बापूजी पोचले व दारोदारी ज्ञानगंगा पोहोचली. महाराष्ट्राला मोठी शिक्षण परंपरा लाभली असल्यामुळे आधुनिक महाराष्ट्र हा महान झाला. 'शिक्षणाचे कार्य पूर्ण झाल्याशिवाय भारतीय लोकशाही सबळ आणि प्रबळ होणार नाही. जगात विज्ञान कितीही प्रगत झाले असले तरी त्याचे मूळ ही विद्या आहे. भारतीय विज्ञान व तांत्रिक शिक्षण विद्येशिवाय पुढे जाऊ शकणार नाही, हे बापुजींनी पक्के लक्षात ठेवून व्यापक प्रमाणात शिक्षणप्रसार केला आहे.'१ आजची शिक्षण पध्दतीची अवस्था समजावून घेतली तर त्या पाश्र्वभूमीवर बापूजींचं कार्य अत्यंत तेजस्वी, तेजोमय आहे हे आपल्या लक्षात येईल.

शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे हे ज्ञान संस्कृतीचे दूत होते.जिथे जिथे अज्ञान, अंधःकार आहे, तिथे तिथे ज्ञानाचा प्रकाश घेऊन गेले पाहिजे, ही बापूजींना तळमळ होती. ज्ञानतपस्वी 'डॉ. जनार्दन वाघमारे बापूजींविषयी लिहितात, ' साधी राहणी, उच्च विचारसरणी ' असा त्यांचा स्वभाव होता. त्यांनी एका महत्वाकांक्षेतून ग्रामीण भागातील सामान्य माणसांच्या दारापर्यंत शिक्षण पोहचवलं... त्यांचं शैक्षणिक कार्य, कर्तृत्व अफाट आहे. गगनाला भिडणारं आहे. म्हणूनच एका हालाखीच्या परिस्थितीतून शिकलेला ध्येयवेडा तरुण पुढे शिक्षणमहर्षी झाला.'२ बापूजी प्रभावी वक्ते होते. सामान्य जनतेला प्रचंड आत्मीयता होती. आपल्या ओजस्वी वाणीतून आणि कृतीमधून समतेचे विचार मांडले.

महात्मा गांधी हे बापूजींच्या जीवनातील प्रेरणास्थान होते. 'डॉ. बापूजी हे महात्मा गांधींचे सच्चे अनुयायी होते. श्रमप्रतिष्ठेवर त्यांचा विश्वास होता. मातीत हात मळविल्याशिवाय, घाम गाळल्याशिवाय शिक्षण पुरे होत नाही, असे त्यांचे तत्वज्ञान होते.'३ म.फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा वारसा बापूजींनी चालविला.बापूजींच्या मते,'सदवर्तणी, सुसंस्कारी, शील संपन्न समाज निर्माण व्हावयाचा असेल तर शिक्षणाची कास पकडावी लागेल.' बापूजींनी रचलेल्या प्रार्थनेत सर्व धर्मातील चांगल्या विचारांना स्थान दिले. बापूजींनी प्रार्थनेत शिक्षणाचा लीनतेशी संबंध जोडला आहे.ज्ञान आणि विज्ञानासोबत सुसंस्कार महत्वाचा मानला.बापूजी म्हणत, 'निर्भय बाण्याचा आणि ताठ कण्याचा शिक्षक मला हवा आहे.' कारण निर्भय शिक्षकच निर्भय पिढी निर्माण करू शकतो. मानवी जीवनक्षमतांचा विकास आणि मूल्यसंवर्धन ही शिक्षणाची उद्दिष्टे आहेत.संस्कारामुळे माणसाला खरे माणूसपण येते.बापूजींनी मूल्याधिष्टीत शिक्षणाला, मानवतावादी दृष्टीकोनाला प्राधान्य दिले.शिक्षणाचा परिणाम मार्कलिस्टवर नाही तर तर वर्तणूकीवर दिसायला पाहिजे. त्यांनी गांधीवादाचा अत्यंत श्रद्धेने आणि निष्ठेने स्वीकार केला.शुद्ध आचार त्यांचा आधार बनला. बापूजी कृतार्थ जीवन जगले. त्यांचे जीवनचिंतन श्रेष्ठ दर्जाचे आहे. बापूजींनी लिहीलेल्या प्रार्थनेतील चिंतनशील आशय मानवी कल्याणाचा आहे. समाजपरिवर्तनामध्ये बापुजींच्या विचारांचे बहुमोल योगदान आहे. ते विचारधन जोपासले पाहिजे.

**भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर:-** आधुनिक भारताच्या नवनिर्मितीत, जडणघडणीत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान अतुलनीय आहे. त्यांचं सारं कार्यकर्तृत्व एका लहान लेखाचा विषय होऊ शकत नाही. ग्रंथांवर अलोट प्रेम करणारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे ज्ञाननिष्ठ वंदनीय नेते होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी समाजात समता व बंधुता ही मूल्ये रुजवून सामाजिक क्रांतीची मशाल पेटविली. दलित, पीडितांच्या जीवनात प्रकाशाची पहाट आणणारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर जगातील सर्व लढणाऱ्या मानवसमूहाला प्रेरणास्त्रोत आहेत.त्यांना प्रत्येक क्षेत्राचे परिपूर्ण ज्ञान व माहिती होती. त्यांनी भारतीय समाजाची चिकित्सा, मूलगामी चिंतन, संशोधन,विश्लेषण, मूल्यमापनाची वस्तुनिष्ठ बैठक असणारे अनेक मौलिक ग्रंथ लिहिले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर एक विचारधारा आहे, काळाची पावलं ओळखणारा हा द्रष्टा महापुरुष आदर्श समाजव्यवस्थेचे महान स्वप्न पाहत होता. त्यांचे उत्तुंग व्यक्तिमत्त्व आणि सर्वव्यापी कार्यकर्तृत्त्व यातून सामाजिक न्यायाची भावना दृगोचर झाली आहे. "बाबासाहेब ही केवळ एक महान व्यक्ती नाही, ती एक शक्ती आहे. दलित समाजाला स्वाभिमान, अस्मिता, आत्मसन्मानाची जाणीव देणारी ती एक ऊर्जा आहे. अशा वेळी मानवी मूल्यांची प्रतिष्ठापना करू शकणाऱ्या महापुरुषाची गरज असते. बाबासाहेबांनी मानवी मूल्यांसाठी आयुष्यभर झुंज दिली."४ साहित्यिकांना मार्गदर्शन करताना ते म्हणतात, आपल्या देशात उपेक्षितांचे, दु:खितांचे फार मोठे जग आहे हे विसरू नका. या देशात सामाजिक अन्याय हजारो वर्षांचा आहे.त्यांचे दु:ख त्यांची व्यथा नीट समजून घ्या आणि आपल्या साहित्याद्वारे त्यांचे जीवन उन्नत करण्यास झटा त्यातच खरी मानवता आहे.आपली लेखणी आपल्या प्रश्नापुरतीच मर्यादित करू नका.तिचे तेज खेड्यापाड्यातील गडद अंधार दूर करील असे परावर्तीत करा.अस्पृश्यांना माणुसकीप्रत आणून देण्याच्या कामात आतुरतेने भाग घेतला पाहिजे.

नेतृत्व करणे म्हणजे मार्गदर्शन करणे होय.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांना दास्यात गुलामगिरीत ठेवणाऱ्या अंधश्रद्धा, अनिष्ट रूढी, परंपरा, धर्मशास्त्रे यांना नकार देऊन स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय अशा श्रेष्ठ मूल्यांवर मानवी समानतेचा प्रचार-प्रसार केला.त्यांचा अखंड संघर्षाचा लढा हा भारतातील सामाजिक विषमतेविरुद्ध होता.आपल्या वाणी व लेखणीने जातीव्यवस्थेवर सतत हल्ला करुन दलित मुक्तीचा लढा उभा केला. पिढ्यानपिढ्या अस्पृश्यतेचा कलंक लेवून जगणाऱ्या मुक्या दलित समाजाला वाचा दिली. त्यांच्या जीवन कर्तृत्त्वाने दलित समाजाला जाग आली, माणसासारखे जगता आले पाहिजे याचे आत्मभान आले.आपल्या अमोघ वक्तृत्वाने व कुशल नेतृत्त्वाने त्यांनी दीन-दलितांच्या, श्रमिकांच्या, विस्थापितांच्या अंध:कारमय जीवनाला प्रज्ञेचा संदेश दिला. त्यांचे सामाजिक समतेचे विचार दिशा देणारे आहेत. भालचंद्र फडके लिहितात, "बाबासाहेबांचे स्मरण करणे म्हणजे त्यांच्या विचारांचे बळ घेऊन जगणे. वर्णद्वेष, वर्गद्वेष, सत्तालोभ, हिंसाचार, वामाचार, जातीय अहंकार इ. कुरूपतांनी या देशाचे जीवन माखलेले आहे. या कुरूपतांचे निर्मूलन करण्यासाठी डॉ. आंबेडकरांच्या तत्वज्ञानाला शरण जायला हवे."५ त्यांनी माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार दिला. समग्र शोषणमुक्तीचा, सामाजिक समतेचा लढा आहे. अन्यायाविरोधात लढा देण्याची प्रेरणा त्यांनी दिली.

आपला बहुजन समाज हजारो वर्षांपासून नाडला जाण्याचं कारण आपल्या जातीपाती आहेत. वर्णव्यवस्थेत अस्पृश्य समाजाचे नैसर्गिक मानवी हक्क हिरावून त्यांना विकासाच्या वाटांपासून नेहमीच उपेक्षित ठेवले गेले. जातीव्यवस्थेच्या जोखडात दडपलेल्या अस्पृश्यांना मुक्त करणे, त्यांचे नाकारलेले माणूसपण बहाल करणे हेच त्यांचे जीवनध्येय होते. भारतीय जातीव्यवस्थेत व्यक्तिला स्वतंत्र आस्तित्व नसते.आपल्या क्षमतांचा पूर्ण विकास करणारी व्यक्ति बाबासाहेब समाजाच्या केंद्रस्थानी मानतात. जातीभेदामुळे

समाजाचा अध:पात होतो.समाजातील जातीव्यवस्था नष्ट होणार नाही आणि समाज समताधिष्ठित जीवनाकडे वाटचाल करणार नाही तोपर्यंत हा देश कधीच मोठा बनणार नाही. संपूर्ण समाजाला शहाणे करून त्याला सामाजिक आणि राजकीय गुलामगिरीतून मुक्त केले पाहिजे. त्यामुळे त्यांनी जाती, धर्म, वर्ग असले भेद कधी मानले नाहीत. नव्या अर्थ व्यवस्थेतही जातीय उतरंडीचे प्रतिबिंब पडले आहे. तुम्हाला अन्न, वस्त्र, निवारा इतर भारतीयांच्या बरोबरीने मिळणे हा तुमचा जन्मसिद्ध हक्क आहे, म्हणून तुम्हाला स्वाभिमानपूर्ण जिणे जगायचे असेल तर स्वावलंबन हाच खरा आत्मोन्नतीचा मार्ग आहे. मला वाटते सर्व भारतीयांनी सर्वप्रथम केवळ भारतीयच असावे. जातीयता व त्यावर आधारित भेदपूर्ण जीवन देशाच्या विशालतेमध्ये बाधा आणते. जोपर्यंत उत्पादनाची साधने थोड्या व्यक्ती आपल्या स्वार्थासाठी राबवत आहेत तोपर्यंत सामान्य माणसाला उत्कर्षाची आशा नाही. माणुसकीशिवाय तुमचे वैभव व्यर्थ आहे.

गावकूसाबाहेरील अज्ञान-अंध:काराला आपल्या तेजाने प्रकाशमान करणारा तेजोमय सूर्य म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर होत. शुद्रातिशुद्रांचा मुक्तीचा मार्ग ज्ञान मिळविणे हाच आहे. म्हणून शोषणमुक्तीसाठी शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही असे त्यांचे ठाम मत होते. त्यांनी जातीयतेचे चटके स्वत: अनुभवले होते.जातीव्यवस्था अंताच्या प्रक्रियेत शिक्षणाचे महत्त्व त्यांनी जाणले. 'शिका संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा क्रांतिकारी संदेश देत वंचित घटकांच्या जीवनात आमुलाग्र बदल घडवून आणण्यासाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले.त्यांच्या मते, 'शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे, जो कोणी प्राशन करेल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही.'उच्च शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे साधन आहे. हे क्षेत्र बुद्धिजीवी वर्गाचे असले तरी या क्षेत्रात गरीब व दुर्बल घटकाला संधी मिळायला हवी.अन्यथा त्यांचे जीवन कष्टप्रदच राहील. स्त्री शिक्षणाविषयी त्यांना आस्था होती.'मी समाजाची प्रगती त्या समाजातील महिलांच्या प्रगतीवरून ठरवितो.' त्यांचे विचार महत्त्वपूर्ण आहेत.

**निष्कर्ष:-** १)शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षण हे समाज उद्धाराचे साधन मानून तळागाळापर्यंत पोहोचावे यासाठी निरंतर प्रयत्न केले.

२) शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे यांचे शिक्षणप्रसाराचे महान कार्य आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मानवतावादी, शिक्षणविषयक विचार व संघर्ष समाजातील विषमता कमी करण्यासाठी प्रभावी ठरले.

३) शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रतिकूल परिस्थितीत मोठ्या कष्टाने राष्ट्र विकास घडवत मानवी मूल्यांची प्रतिष्ठापना केली.

४) शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे यांचे शैक्षणिक तत्वज्ञान व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक, न्यायविषयक विचार, समाजबदलासाठी केलेले अटळ संघर्ष यांची प्रस्तुतता वर्तमानात अधिक महत्त्वाची ठरते आहे.

५) आज समाजात शांतता आणि सुव्यवस्थेचा अभाव जाणवत आहे. धर्मांधता वाढत आहे. धार्मिक, जातीय संघर्षातून सामाजिक सलोखा बिघडला आहे. समाजाचे सर्व बाजूंनी नैतिक अध:पतन झपाट्याने होत आहे.

६) समग्र समाजाचा विचार हा समरसतेच्या विचाराचा पाया आहे. समरसतेशिवाय समता आस्तित्वात येऊ शकत नाही. दुर्दैवाने आजही जातीप्रथा व अस्पृश्यता आपल्या देशात मोठ्या प्रमाणात पसरत आहे.

**संदर्भ:-**

१) डॉ. गजानन सुर्वे, शिक्षणमहर्षी परमपूज्य डॉ.बापूजी साळुंखे (व्यक्ती आणि कार्य), श्री मुरारी मुद्रणालाय कोल्हापूर, दुसरी आवृत्ती, २००२, पृ.११.

२) विवेकदीप गौरवगाथा शिक्षणमहर्षींची खंड २:कर्तृत्वगाथा व विचारगाथा शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे जन्मशताब्दी गौरवग्रंथ, संपादक प्राचार्य नारायणराव गायकवाड व संपादक मंडळ, प्रकाशक प्राचार्य अभयकुमार साळुंखे, प्रिंट ओम ऑफसेट, सातारा, प्रथम आवृत्ती, ८ ऑगस्ट,२०१९ पृ.४३.

३) प्रा. डॉ. करिअप्पा खापरे, ज्ञानपंढरीचा वारकरी, शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे, सुपर ऑफसेट, कोल्हापूर, प्रथमावृत्ती ९ जून, २०१०. पृ. ११०

४) भालचंद्र फडके, 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर', श्रीविद्या प्रकाशन, पुणे ३० प्रथमावृत्ती, ऑक्टोबर १९८५, पृ.२७९

५) तत्रैव, पृ.२.